**टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विभागातर्फे कासेवाडीत महिला दिन उत्साहात साजरा**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि.८ मार्च २०१४ रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विभागातर्फे कासेवाडी येथील रहिवाशी महिलांकरिता २१ व्या शतकातील महिला आणि वास्तव या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यान देण्याकरिता दिशा या स्वयंसेवी संस्थेच्या संचालिका श्रीमती पौर्णिमा गादिया यांना आमंत्रित केले होते. व्याख्यानादरम्यान श्रीमती गादिया यांनी सहजपणे महिलांशी संवाद साधला. संवाद साधताना त्या म्हणाल्या महिलांनी एकजुटीने राहिले पाहिजे एकमेकींबरोबर चांगले व सकारात्मक सहसंबंध निर्माण केले पाहिजे, जेणेकरून घरगुती पातळीवर व सामाजिक पातळीवर महिलेचा होणारा छळ आपणच कमी करू शकू तसेच वस्तीतील महिलांना त्यांनी बचतीचे महत्व पटवून देताना त्या म्हणाल्या पारंपारिक पध्दतीने म्हणजे घरांमध्ये डब्यामध्ये पैसे ठेवून स्त्रीया बचत करत होत्या परंतु आता पोस्ट, बॅंका आणि पतपेढी ह्या पर्यायी संस्थाचा वापर केला तर धनसंचय वाढू शकेल. बचत गट हे आर्थिक, सामाजिक आणि भावनिक देवाणघेवाणाचे एक प्रभावी माध्यम असून त्याचा लाभ महिलांनी घेतला पाहिजे. तसेच महिलांनी हे सर्व करत असताना स्वत:च्या आरोग्याकडेही लक्ष देण्याची गरज त्यांनी नमूद केली.

सदर कार्यक्रमास एकूण १५० महिला उपस्थित होत्या. व्याख्यानादरम्यान महिलांनी अनेक प्रश्न विचारले आणि माहिती मिळवली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेमध्ये समाजकार्य विभागाचे विद्यार्थी , कासेवाडी येथील स्थानिक रहिवाशी यांचेही सहकार्य लाभले. कासेवाडी समुदायातील महिला प्रतिनिधी सौ.सुरेखा खंडागळे व समाजकार्य विभागातील सहाय्यक प्राध्यापक सदर कार्यक्रमास उपस्थित होते.

# Womens Day Program at Kasewadi on 08-Mar-2014




